भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०६/२०१७

**१) घराच्या मागील दाराची संकल काढुन गोदरेज आलमारीतील सोन्या, चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २८/०६/२०१७ चे १०.३० ते २९/०६/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी ओमप्रकाश तिलकचंद पालीवार वय ५३ वर्ष, रा. उकारा हे आपल्या परीवारासह रात्रीला जेवन करुन घराचे वऱ्हांडयात झोपले असतांना कोणीरती अज्ञात चोराने फिर्यादीचे मागील दाराची संकल काढुन आत प्रवेश करुन गोदरेज आलमारीतील १ सोन्याची नथ ४ ग्रॅम, २ सोन्याचे मंगळसुत्र ४५ ग्रॅम, सोन्याच्या अंगठया ६ नग २० ग्रॅम, ८ नग सोन्याचे टॉप्स ३२ ग्रॅम, १ नग सोन्याची बेन्दी १० ग्रॅम, चांदीची पायल १० नग, चांदीच्या पायल तुटलेले ६ नग, चांदीच्या बिछव्या १६ नग, चांदीचे सिक्के १,०००/—रु. नगदी ५,०००/—रु. असा एकुण २०१०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) दुकानाचे मागील खिडकीचे ग्रिल तोडुन दुकानातील दोन फोटो कॅमेरे व चिल्लर पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २८/०६/२०१७ चे १८.०० वा ते २९/०६/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील अज्ञात चोराने फिर्यादीचे मुलाचे दुकानाचे मागील खिडकीचे ग्रिल तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील निकॉन कंपनीचा मॉडेल डी ६० चा १ व मॉडेल डी ९० चा असे दोन फोटो कॅमेरे किंमती ६०,०००/—रु. व चिल्लर अंदाजे ५००/—रु. असा एकुण ६०,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकास धडक मारुन गभिर जखमी केल्याने औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २८/०६/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील मृतक शोभाकर श्रावण मेश्राम वय ४५ वर्ष, रा. लाखांदुर याची प्रकृती बरी नसल्याने ते ग्रा. रु. लाखांदुर येथे जावुन उपचार करुन घराकडे पायी परत येत असता मागेहुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने,निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक मारुन गंभिर जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा.रु. लाखांदुर येथे प्रथमोपचार करुन पुढील उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता मृतक हा उपचारा दरम्यान मरण पावल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र व फिर्यादी सुधाकर श्रावण मेश्राम वय ६२ वर्ष, रा. ब्रम्ही यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४(ब)मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणे चालवुन अपघात करुन एकाचा मृत्यु व एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २९/०६/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर निळा रंग असलेला न्यु हॉलन ३०३२ कंपनीचा ज्याला ९ फाऱ्या असलेला लोखंडी नांगर लावलेल्या ट्रॅक्टरवर यातील मृतक साहील अरुण डोये वय १३ वर्ष, रा. सकरला व जखमी विशाल कुसन सार्वे वय २२ वर्ष, रा. सालबर्डी हे बसुन जात असता सदर ट्रॅक्टर हा आरोपीने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन अपघात करुन मृतकचे मरणास व विशाल यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी विलास सोमाजी मते वय ३० वर्ष, रा. काठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४(अ)(ब)/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**५) ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे चालवुन स्विप्ट गाडी मागेहुन धडक मारुन गाडीचे नुकसान करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २९/०६/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी अनिकेत विनायक शहारे वय २४ रा. लाखांदुर हा आपली स्विप्ट गाडी क्र.एमएच ३६ एच ८३७४ ने कारधा कडुन भंडारा कडे एनएच ६ रोड ने येत असता त्याचे मागेहुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मागेहुन धडक देवुन अंदाजे ५० ते ६० फुटा पर्यत घासत घेवुन जावुन गाडीचे नुकसान करुन नागपुरचे दिशेने पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादंवि. सहकलम १३४/१७७,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २९/०६/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. गोबरवाही येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**७) विहीरीचे पाण्यात उडी घेवुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २९/०६/२०१७ चे १७.४२ वा. पुर्वी. यातील मृतक शेखर नामदेव सेलोकर वय ५० वर्ष, रा. शुक्रवारी वार्ड पवनी हा दारु पिण्याचे सवईचा असल्याने तो रात्री बेरात्री दारु पिण्यास घराबाहेर जात असे मृतक ने दारुचे नशेत घरा जवळील सार्वजनीक विहीराचे पाण्यात उडी घेवुन आत्महत्या केल्याने फिर्यादी दिलीप शेखर सेलोकर वय २५ वर्ष, रा. शुक्रवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट व स्टे. डा साना क्र. ३३/१७ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, तुमसर, सिहोरा, आंधळगाव,अडयाळ गोबरवाही, व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५४ लिटर हातभट्टी दारु किंमती ३२६०/—रु. २० लिटर ८८० मिली लिटर +२ मोटार सायकल किंमती ३५९९२/रू. असा एकुण किंमती ३९२५२/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

३०/६/१७

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.